अक्षय भाषा AKSHAYBHASHA

A non-profit organization in Mesa, AZ, USA Tax ID # 30-0280809

**“स्वयंप्रकाशी स्वरतारे” या कार्यक्रमाच्या**
**आयोजिकेचे मनोगत**
**लेखिका - भाग्यश्री बारलिंगे**
**मेसा, ॲरिझोना**

काल कार्यक्रमात बरंच काही बोलायचं होतं, कलाकारांचं कौतुक करायचं होतं पण मनातील घड्याळाचा लंबक 'पुरे, पुरे,(बोलणे) पुरे' असं म्हणत हलत होता. त्यामुळे बोलणे आवरते घ्यावे लागले तरी या बहारदार आणि भरीव कार्यक्रमामुळे निर्माण झालेल्या भावना, विचार, आनंद हे सगळं कागदावर उतरवून काढल्याशिवाय रसिक म्हणून, आयोजक म्हणून, एक मराठी व्यक्ती म्हणून या कार्यक्रमाला न्याय दिल्यासारखे वाटणार नाही, म्हणून हा लिहिण्याचा प्रपंच !
ऑगस्ट २७ रोजी रविवार दुपारी चार वाजता अक्षयभाषा संस्थेतर्फे आयोजित केलेला 'स्वयंप्रकाशी स्वरतारे' हा कार्यक्रम ॲरिझोनातील मेसा आर्टस् सेंटरच्या सुंदर रंगमंचावर संपन्न झाला. नृत्य-गायनाचे कार्यक्रम आपण बरेच बघतो. पण या कार्यक्रमाची खासियत अशी होती की अतिशय दर्जेदार आणि व्यावसायिक पातळीवरचा हा कार्यक्रम भारतातील कलाकारांनी सादर केला नसून तो पूर्णपणे अमेरिकेतील (सियाटल, न्यूयॉर्क, फीनिक्स ) कलाकारांनी केला होता. त्यांच्या कलेची पातळी, त्यांना असलेली कलेची समज हे सर्व बघतां सूज्ञांच्या हे लक्षात यावं की हे केवळ हौशी कलाकार नाहीत तर कलेची उपासना करणारे साधक आहेत. अश्या कलाकारांना व्यावसायिक पातळीवर काम करायला मिळावं अशी सध्या तरी उत्तर अमेरिकेत सोय नाही. ही उणीव लक्षात घेऊन BMM सारख्या संस्थांनी असा अवकाश निर्माण केला पाहिजे.

कार्यक्रमाचे कथन राजश्री सोमण हिने स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाइतक्याच सुंदर शब्दात लिहिले व परिणामकारक रित्या सादर केले. शाळा कॉलेजात असताना तिनं आवडीनं केलेलं हे काम, सरस्वती नदी जशी लुप्त व्हावी तसं संसाराच्या रहाटगाडग्यात लुप्त झालं होतं. या कार्यक्रमामुळे लेखन-कथनाचा गुण परत उफाळून वर आला, या गुणाला  उजाळा मिळाला, याचा मला आनन्द आहे. अश्या कार्यक्रमातूनच कलाकार घडत जातात. म्हणूनच त्यांचं महत्त्व !
प्रेक्षागृहात बसले असताना असं वाटत होतं की रंगमंचावर थोड्या थोड्या वेळानं ऊर्जेचं कारंजं उफाळून येतंय आणि त्याच्या तुषारात आपण न्हाऊन निघतोय.

संकेत जोशी, जयंती देशमुख, अरुंधती टेंबे आणि सहाय्यक गायिका श्रीदेवी लोथे आणि शांभवी कुलकर्णी यांच्या तालीमबद्ध समरसून गायलेल्या गाण्यांमुळे एक सुंदर सांगीतिक आकाश निर्माण झालं होतं आणि ह्या आकाशात प्रेरणा (पारखी) नावाची बिजली तिच्या सहाय्यक नर्तिका मयुरा रेगे आणि अपर्णा साने यांच्यासह  आपल्यातली कलात्मक ऊर्जा उधळून देत अनेक कठीण, कल्पनासमृद्ध आणि रंगमंचावरील अवकाशाला भारीत करणारी नृत्यं करीत होती. हा सोहळा, ही सरस्वतीची उपासना दीर्घकाळ प्रेक्षकाच्या मनावर बिंबित राहील, यांत काही शंका नाही.
संदीप सिरा, श्रेयस रवी, आशिष शानभाग या वादकांना नक्कीच दोन पेक्षा जास्त हात असावेत असं वाटायला लावणारं त्यांचं वादनकौशल्य ! त्यांनी निरनिराळ्या वाद्यातून आणि कीबोर्डमधून निर्माण केलेला नाद आणि ताल हा शब्दांबरोबर आणि शब्दांशिवायसुद्धा ऐकत राहावा असं वाटत होतं.
बहुतेक सर्व कलाकार साधारणतः एकाच वयोगटातील होते. पण आदित टेंबे या बालकलाकाराने नाट्यगीत गाऊन प्रेक्षकांना चकित केलं आणि त्याचं पहिलं ध्वनिमुद्रित गीत गाऊन प्रेक्षकांची मने जिंकली.
या कार्यक्रमाची निर्माती डॉ. अरुंधती टेंबे हिने अक्षयभाषा संस्थेसाठी पूर्वीही कार्यक्रम केले आहेत. पण 'स्वरतारे' मुळे व्यक्ती म्हणून आणि या ग्रुपची लीडर म्हणून परत एकदा नव्यानं ओळख झाली आणि तिचा इतरांना जपणारा राजसपणा जाणवला.
कुठल्याही कार्यक्रमाच्या यशात मदत करणारे अदृश्य हात असतात. ते हात होते स्वयंसेवक हेमंत शेट्ये, अस्मिता देशमुख, मयुरी कुलकर्णी, अल्पा शाह यांचे. या सर्वांनी स्वतःहुन संस्थेशी संपर्क करून, स्वतःचा अनेक तासांचा (रविवारचा !) वेळ कुठलीही मागणी न करता देऊन ‘स्वयंसेवक’ हे बिरुद सार्थ केलं. या सगळ्यांना मी मनापासून धन्यवाद देते.
उदय पत्की यांनी ध्वनियोजना उत्तम सांभाळली. वैभव टेंबे, अमित सोमण, रोहित देशमुख यांनी अनेक पडद्यामागील कामे करून कार्यक्रमाला आधार दिला. काही लोकांना आणीबाणीच्या वेळी बोलावलं गेलं जसे की निखिल देशपांडे याला प्रास्ताविक करण्यासाठी कार्यक्रमा आधी काही दिवसांपूर्वी, आकाश त्रिवेदीला कार्यक्रमाच्या व्हिडिओ रेकॉर्डिंगसाठी आदल्यादिवशी आणि ओंकार कऱ्हाडेला कार्यक्रमाच्या दिवशी सकाळ मध्यावर आली असताना प्रकाशयोजनेसाठी ! या सगळयांच्या दिलदारपणामुळे माझा नारायण झाला नाही. त्यामुळे मी त्यांची ऋणी आहे. (तसेच त्यांनी कलेसाठी आपत्कालीन सेवा सुरु करावी असं मी सुचवेन.😊)

ह्या कार्यक्रमामागचे कष्ट, कलात्मक दृष्टी, शेकडो मैलांवरून केलेलं टीमवर्क, कलाकारांचे गुण आणि जिद्द हे सर्व स्वयंप्रकाशी होतं. हे कलाकारच स्वतः फिनिक्सचे स्वरतारे झाले; त्यांना अमेरिकेतील इतर ठिकाणी जाऊन झगमगण्याची संधी मिळू दे, या सदिच्छा !

हा कार्यक्रम अमेरिकेत इतरत्र कुठे करायचा असल्यास डॉ. अरुंधती टेंबे यांच्याशी arundhatisoman@yahoo.com ह्या ईमेलवर संपर्क साधावा.  धन्यवाद.
**********************************************************************

अक्षयभाषा या नॉन-प्रॉफिट संस्थेला देणगी देण्यासाठी संस्थेची वेबसाईट
https://akshaybhasha.org

========================
अक्षयभाषा संस्थेतर्फे आयोजित केलेले महत्वाचे कार्यक्रम –

**‘Playing in the meadow of life’-**
**Poetry of DR. Smita Kittur**
https://youtu.be/8RsmCq1VqqU

**Dr Thatte program-**

**Part 1-**
https://youtu.be/wAeVgy-QmcY

**Part 2-**
https://youtu.be/kataHs8hRHk

**A webinar on Palliative care :**
https://youtu.be/G6H6dsse8KU

========================

https://tinyurl.com/mpsm7tah
Akshaybhasha Youtube
channel चे (विनामूल्य) सदस्यत्व घेतल्यास अक्षयभाषा कलाकारांनी सादर केलेल्या विविध कार्यक्रमांचा आस्वादघेता येईल.
========================
Akshaybhasha Facebook page:
Please, like & follow https://tinyurl.com/ad6k4jrp

========================
जर 'अक्षयभाषा'च्या ईमेल्स तुम्हाला नको असतील तर
bcbarlingay@gmail.com ह्या ईमेलवर तसे जरूर कळवावे.
========================